महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : 6 वा | दिनांक : 15/09/2024 | वार : रविवार

## आमचे सरकार आल्यास तुमच्या हक्काची जुनी पेन्शन योजना आम्ही लागू करू : उद्धव ठाकरे



**शिर्डी (प्रतिनिधी) :** माजी मुख्यमंत्री व शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जुनी पेन्शन योजनेच्या महाअधिवेशनात कर्मचाऱ्यांना संबोधित करताना आंदोलकांशी संवाद साधला आहे. यावेळी बोलताना त्यांनी या आंदोलक कर्मचाऱ्यांना विनंती केली की उपोषण करू नका, या सरकारवर उपोषणाची वेळ आणा, असे आव्हान केले. तसेच जुनी पेन्शन योजना आम्ही लागू करू, तुम्ही फक्त आम्हाला निवडून आणा, असेही आवाहन केले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, ही जुनी पेन्शन योजना आपण सगळे मिळून खेचून आणू. तुमची एकजूट पाहता हे सरकार गेल्यातच जमा आहे. आमचे सरकार आणा, जुनी पेन्शन योजना अंमलात आणतो.

सरकारच्या योजना राबवणारे तुम्ही आहात, लोकांच्या घराघरात जाऊन तुम्ही सरकारचे काम करता, तरी योजनेच्या पोस्टरवर फोटो या दाढीवाल्यांचे लागतात, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे.

महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, ज्यांना बहीण आहे हे माहीत नव्हेत, निवडणुका जवळ आल्या की यांनी लाडकी बहीण योजना काढली, असा टोला त्यांनी लगावला आहे. कोरोनाच्या काळात तुम्ही सगळ्यांनी जिवावर उदार होऊन कामे केलीत म्हणून महाराष्ट्र वाचला आहे. तरी सुद्धा हे सरकार तुम्हाला तुमच्या हक्काची पेन्शन देत नाही. आपले सरकार पुन्हा आणा, आम्ही तुम्हाला तुमच्या हक्काची पेन्शन मिळवून देऊ, असे आश्वासन उद्धव ठाकरे यांनी दिले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, मला कोणीही सत्तेतून काढू शकत नाही. बाळासाहेब ठाकरे यांचेकडे कुठे सत्ता होती, पण तरी त्यांच्याकडे सत्ता होती, जनतेची सत्ता होती.

तशीच ही जनताच माझी सत्ता आहे, असे उद्धव म्हणाले. पुढे ते म्हणाले, कर्मचाऱ्यांनी साथ दिली नाही तर सरकारच चालू शकत नाही. तुम्ही घरोघरी जाऊन सरकारच्या योजना पोहोचवण्याचे काम करता मात्र श्रेय हे घेतात आणि म्हणतात सरकार आपल्या दारी, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांचे महाराष्ट्रभरात दौरे सुरु झाले आहेत. मागील महिन्यात युवसेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी छत्रपती संभाजीनगरचा दौरा केला होता. यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे शिर्डी आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये सभा घेणार आहेत.

## डिजेच्या आवाजाची स्पर्धा, हावभाव अन् इशाऱ्यावरून पाथर्डीत हाणामारी : पोलिसांनी लाठीचार्ज करत पांगवला जमाव



पाथर्डी (प्रतिनिधी) : कोणाच्या डीजेचा आवाज मोठा अशी खुन्नस लागली. विसर्जनासाठी गणपतीची मिरवणूक पाठोपाठ चाललेली असताना डी. जे. नाईक चौकात समोरासमोर येऊन आवाजाची स्पर्धा सुरू झाली. उत्साही तरुण धुंदीमध्ये डीजेवर चढून नाचू लागले. हावभाव, इशाऱ्यावरून वाद उद्भवत काही कळायचे आत हाणामारी सुरू झाली. पोलिसांनी तात्काळ धाव घेतली. लाठीचार्ज करत जमाव पांगवला. पाच मिनिटातच जमावावर पोलिसांनी नियंत्रण मिळवले.

नाथ नगर व वामन भाऊ नगर मधील दोन मंडळांच्या मिरवणुका गणपती विसर्जनासाठी निघाल्या. विक्षिप्त हावभाव व उडत्या चालीच्या गाण्यांवर डीजे पुढे उत्साही तरुण नाचत होते. डी.जे व लेसर लाईटला परवानगी नसतानाही एका मंडळाकडून डीजेत लेझर लाईटवर कार्यकर्ते बेधुंद नाचत होते.

नगर रस्त्याने व शेवगाव रस्त्याने आलेल्या दोन्ही मंडळांचा सामना जुन्या बस स्थानकाजवळील नाईक चौकात झाला. काही काळ दोन्ही मंडळांचा दणदणाट सुरू होता. आवाजाच्या सर्व मर्यादा ओलांडून डीजेवर तरुणांनी ताल धरला. सुमारे अर्धा किमी लांब असलेल्या कसबा विभागातही डीजेचा आवाज ऐकू येत होता. काही कळायच्या आत पाठोपाठ चाललेले डीजे समोरासमोर आले. रात्री नऊ वाजेच्या समारास बाजारपेठ बंद होत होती.

एका मंडळाचे काही उत्साही कार्यकर्ते डीजेच्या पाचव्या थरावर चढून नाचू लागले. बेभान झालेल्या कार्यकर्त्याला अन्य एका कार्यकर्त्याचा धक्का लागून तो खाली पडला. जबर जखमी झालेल्या कार्यकर्त्याला पाहण्यासाठी गर्दी जमली. मारहाण झाल्याचे वाटून दोन्ही बाजूकडील कार्यकर्ते परस्परांवर भिडले. पोलिसांना बातमी कळतात संपूर्ण फौज फाटा पोहोचून लाठीचार्ज सुरू केला.

पोलिस स्टेशनमध्ये गणेशोत्सवानिमित्त सत्यनारायण पूजा व महाप्रसाद कार्यक्रमानिमित्त पोलीस, त्यांचे कुटुंबीय व मान्यवर उपस्थित होते. सर्व पोलीस एकत्रित असल्याने वेळेवर मदत पोहोचून मोठा अनर्थ टळला.

रात्री पोलिसांनी बळाचा वापर करून जमाव पांगावला नसता तर मोठा अनर्थ घडला असता.

शहरातील वातावरण शांत व तणावपूर्ण पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे म्हणाले, काल रात्री नऊ-साडेनऊच्या सुमारास माहिती मिळताच सर्व पोलिस फौजफाटा घटनास्थळी पोहोचला. परिस्थितीचे गांभीर्य पहात बळाचा वापर करून जमाव पांगवला. जखमी व्यक्तीच्या जबाबानंतर गुन्ह्याची नोंद होईल. सध्या शहरातील वातावरण शांत व तणावपूर्ण आहे. याचा परिणाम देखावे पाहणाऱ्यांवर व मिरवणुकीवर होत आहे

## बहिणींची अब्रू वाचविण्याची गरज - शरद पवार

### अन् सरकार लाडक्या बहिणींना 1500 रुपये देतंय



**धुळे :** हे सरकार बहिणींना 1500 रुपये देणार आहे. पण बहिणींची अब्रू वाचविण्याची गरज आहे. बहिणींचा सन्मान राखला जावा, त्याकडे या सरकारचे मुळीच लक्ष नाही असे म्हणत शरद पवार यांनी राज्य सरकारच्या लाडक्या बहीण योजनेवरुन टोला लगावला आहे.

दरम्यान शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात गुंडगिरीचे राज्य सुरु आहे. सत्तेचा गैरवापर सुरु आहे. काखाने, सहकार चळवळी यांच्यासाठी या सरकारने काहीही काम केलं नाही. तसंच रोजगाराच्या संधीही निर्माण केल्या नाहीत. मागच्या 10 वर्षांत देशाचा विकास झालेला नाही, असे म्हणत राज्य सरकारवर निशाणा साधला.

शरद पवार म्हणाले की, सरकार लोकांच्या सेवेसाठी आहे, सत्तेचा माज काहींच्या डोक्यात आला आहे. सत्तेचा उन्माद आहे, त्यांना जागा दाखविण्याचे कामं या निवडणुकीत करायचे आहे. बाबासाहेबांनी लोकशाहीचा अधिकार आपणास दिला आहे. परंतु या लोकांना सत्तेचा उन्माद चढला आहे. त्यांना आता खड्यासारखे बाजूला काढा. या निवडणुकीत ती संधी तुम्हाला आहे.

शरद पवार म्हणाले की, आजच्या राज्यकर्त्यांना शेती आणि शेतकरी यांच्याविषयी काहीही आस्था नाही. मी दहा वर्षे कृषी मंत्री म्हणून काम केलं आहे. त्यावेळी देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. मी 10 वर्ष या खात्याचे काम पाहिलं आणि 2014 मध्ये मी त्या खात्याचं काम सोडलं. त्यावेळी मला सांगायला अभिमान वाटतो की, भारत देश 10 वर्षात जगातील गहू निर्यात करणारा दोन नंबरचा देश बनला. मोदी सरकारने कांद्यावर निर्यातबंदी आणली. कांद्याला भाव मिळाला नव्हता. कांदा उत्पादक शेतकऱ्याने कष्टाने पिक घेतलं. त्यानंतर निर्यातबंदी करण्यात आली. गहू, तांदूळ याबाबत हे घडलं. जे पिकवाल त्या धान्यावर, उत्पादनावर निर्यात बंदी. मोदी सरकार शेतकरी विरोधी आहे,असा हल्लाबोल शरद पवारांनी केला आहे.

## नावे वगळून मुस्लिमांचे मतदान कमी करण्याचा प्रयत्न

**अहमदनगर :** आगामी विधानसभा निवडणुकीला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. नवीन मतदारांची नोंदणी आणि मतदार याद्यांची तपासणी सुरू आहे. अशातच आता एमआयएमचे अहमदनगर जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी मतदार याद्यांवरून गंभीर आरोप केले आहेत.

डॉ. परवेज अशरफी म्हणाले की, " सरकारी यंत्रणेला हाताशी धरून अहमदनगरच्या मतदारयादीतून अनेक मुस्लिमांची नावे वगळण्याचे षडयंत्र रचले जात आहे. ज्या पक्षाला आणि ज्या आघाडीला मुस्लिम समाजाने लोकसभा निवडणुकीत भरभरून मते दिली, त्या आघाडीचे काही नेतेही यात समील आहेत, असा आरोप एमआयएमचे जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी केला आहे. मतदार यादीवर हरकती नोंदविताना या गोष्टी जाणीवपूर्वक केल्या जात असल्याचा आरोप करीत डॉ. अशरफी यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री, अल्पसंख्याक आयोग, खासदार असद्दुद्दिन अवैसी, एमआयएम पक्षाचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील, कार्याध्यक्ष डॉ. गफ्फार कादरी यांना निवेदन पाठवून लक्ष घालण्याची मागणी केली आहे.

## प्रत्येक डॉक्टरची एक युनिक आयडी असेल

### NMC पोर्टलवर नोंदणी आवश्यक, देशात किती डॉक्टर्स आणि कोणती पदवी आहे हे कळेल

आता देशातील प्रत्येक डॉक्टरची वेगळी ओळख असेल. त्यांना एक युनिक आयडी क्रमांक दिला जाईल. सरकारने सर्व डॉक्टरांसाठी राष्ट्रीय वैद्यकीय नोंदणी (NMR) मध्ये नोंदणी अनिवार्य केली आहे. डॉक्टरांना एमबीबीएस प्रमाणपत्र, नोंदणी आणि आधार कार्ड सादर करावे लागेल. हे पोर्टल नॅशनल मेडिकल कमिशनने तयार केले आहे.

नॅशनल मेडिकल कमिशनने नुकतीच नोटीस जारी केली होती. ज्यामध्ये असे लिहिले होते की, इंडियन मेडिकल रजिस्टर मध्ये नोंदणीकृत सर्व एमबीबीएस डॉक्टरांना आता नॅशनल मेडिकल रजिस्टर मध्ये देखील नोंदणी करावी लागेल. देशातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये/संस्था आणि राज्य वैद्यकीय परिषदाही या पोर्टलशी जोडल्या जातील.

**नोंदणी प्रक्रिया करण्यसाठी - हे तीन कागदपत्र आवश्यक:**

1. आधार कार्ड
2. एमबीबीएस सर्टिफिकेट
3. प्रॅक्टिस सर्टिफिकेट

**या कागदपत्रांची पुष्टी कोण करणार?**

- स्टेट मेडिकल कौन्सिल
- संबंधित कॉलेज/ इन्स्टिट्यूट
- नॅशनल मेडिकल कमिशन

पोर्टलवर नोंदणीसाठी, डॉक्टरांना त्यांचा आधार आयडी, एमबीबीएस पदवी प्रमाणपत्राची



डिजिटल प्रत आणि स्टेट मेडिकल कौन्सिल/मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करावी लागेल. उर्वरित माहिती व्यक्तिचलितपणे प्रविष्ट करावी लागेल.

फॉर्म भरल्यानंतर तो पडताळणीसाठी संबंधित राज्य वैद्यकीय परिषदेकडे पाठवला जाईल. त्यानंतर राज्य परिषद हा अर्ज संबंधित महाविद्यालय किंवा संस्थेकडे पुढील पुनरावलोकनासाठी पाठवेल.

पडताळणीनंतर अर्ज राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडे पाठवला जाईल. महापालिका त्याची पडताळणी करून पोर्टलवर लाईव्ह करेल.

**राष्ट्रीय वैद्यकीय नोंदणी का आवश्यक आहे?** नॅशनल मेडिकल कमिशनच्या एका अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, आजपर्यंत आमच्याकडे असा कोणताही डेटा नाही जो सांगू शकेल की देशात किती डॉक्टर आहेत. हा आकडा अंदाजित असला तरी नेमका आकडा आता कळेल. याशिवाय किती डॉक्टर देश सोडून गेले. किती डॉक्टरांचे परवाने रद्द झाले? किती डॉक्टरांना जीव गमवावा लागला? ही सर्व माहिती आता एकाच पोर्टलवर दिसणार आहे. अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, 13 लाखांहून अधिक डॉक्टर त्यात सामील होऊ शकतात.

सामान्य लोक देखील डेटा पाहू शकणार आहेत नॅशनल मेडिकल कमिशनचे सचिव डॉ. बी. श्रीनिवास म्हणाले, पोर्टलवर डॉक्टरांची नोंदणी तत्काळ प्रभावाने सुरू झाली आहे. यामध्ये काही डेटा सर्वसामान्यांना दिसेल. उर्वरित माहिती नॅशनल मेडिकल कमिशन, स्टेट मेडिकल कौन्सिल, नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन, एथिक्स अँड मेडिकल रजिस्ट्रेशन बोर्ड आणि मेडिकल इन्स्टिट्यूट यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार दृश्यमान असेल.




## प्रियकरासोबत नको ‘त्या’ अवस्थेत पाहिल्याने निर्दयी मुलीने जन्मदातीलाच संपवले



**खालापूर :** तालुक्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेबाबत सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. प्रियकरासोबत नको त्या अवस्थेत पाहिले म्हणून निर्दयी मुलीने जन्मदात्या आईलाच संपवल्याची घटना परखंदे अहिल्यानगर गावात घडली आहे. संगीता मारुती झोरे असे मयत महिलेचे नाव आहे.

मयत संगीता या आपल्या दोन मुलींसह परखंदे अहिल्यानगर गावात राहत होत्या. मंगळवारी पहाटे साडेचारच्या सुमारास संगीता यांना झोपेतून जाग आली. यावेळी संगीता यांना त्यांची मोठी मुलगी भारती ही तिचा प्रियकर संतोष नांदगावकर याच्यासोबत नको त्या अवस्थेत दिसली.

संगीता यांनी आरडाओरडा करण्यास सुरवात केली. यावेळी संतोषने त्यांचे तोंड दाबून त्यांना जमिनीवर खाली पाडले. त्यानंतर संगीताच्या तोंडावर घरातील ब्लँकेट दाबून धरले. तर भारतीने आईचे पाय पकडले. श्वास कोंडल्याने संगीता यांचा मृत्यू झाला. संगीता यांची हत्या झाल्याचे लपवण्यासाठी आरोपींनी साडीने घराच्या छताच्या लोखंडी पाईपला मृतदेह लटकवला. तसेच पायाजवळ लाकडी स्टूल ठेवून हत्येला आत्महत्या दाखवण्याचा प्रयत्न केला.

घटना घडली तेव्हा संगीता यांची लहान मुलगीही तेथे उपस्थित होती. लहान मुलीने सर्व घडला प्रकार नातेवाईकांना सांगितला. यानंतर ही हत्येची घटना उघडकीस आली. नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार खालापूर पोलीस ठाण्यात भारती झोरे आणि तिचा प्रियकर संतोष नांदगावकर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे.

अधिक तपास खालापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार करत आहेत. पोटच्या मुलीनेच आईला संपवल्यामुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.